## "प्रेस नोट"

**गु.प्र.शा.गु.अ.वि. कक्ष-१०, मुंबई** **दिनांक :- २७/०८/२०२६**

**कुरीयर आणि ई कॉमर्स कंपन्यांची फ्रॅन्चायजी देण्याचे बहाण्याने लोकांची फसवणुक करणा-या कॉल सेंटरवर कारवाई केलेबाबत.**

---

कक्ष १०, गुन्हे शाखा, मुंबई यांना प्राप्त गोपनीय खबरीच्या अनुषंगाने,.''इन्स्टा ट्रान्सफर बिझ, प्रा. लि. ३०५, एव्हरशाईन मॉल को. ऑ., लिंक रोड, मालाड प. मुंबई ६४ '' या कॉलसेंटरवर दिनांक २४/०८/२०२६ रोजी छापा मारला. सदरवेळी नमुद कंपनीचे मालक, एचओडी व मॅनेजर हे त्यांचे टेलीकॉलरच्या मार्फतीने मुख्यत: मुंबई व महाराष्ट्राबाहेरील नागरीकांना संपर्क साधून त्यांना ॲमेझॉन, फ्लिपकार्ट, मंत्रा, ब्ल्यू डार्ट, डीटीडीसी, बिग बास्केट इ. वेगवेगळया कुरीयर कंपनी आणि ई कॉमर्स कंपनी सोबत करार असल्याचे खोटे सांगून लाईलटाईम पार्सल डिलीवरी फ्रॅन्चायजी देण्याचे आश्वासन देवून मोठया परताव्याचे अमिष दाखवून नागरीकांची फसवणुक करतांना आढळून आले. सदरबाबत कक्ष १० गुन्हे शाखा, मुंबई येथे गु.प्र.शा., गु.र.क्र. १०८/२६, कलम ३१८(४), ३(५) भारतीय न्याय संहिता २०२३ तथा कलम ६६(ड) इन्फॉरमेशन टेक्नॉलॉजी ॲक्ट २००० (बांगुरनगर पोलीस ठाणे, गु.र.क्र. ८२४ /२६) प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे. नमुद गुन्हयाचे तपासांदरम्यान कंपनीचे संचालकासह ०९ आरोपींना अटक करण्यात आली असून त्यांना दिनांक २८/०८/२०२६ पर्यत पोलीस कोठडी मंजूर करण्यात आली आहे.

**नमुद कारवाईदरम्यान खालीलप्रमाणे मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.**

१) संगणकांचे १०५ हार्डडिस्क,
२) ३२ लॅपटॉप,
३) ३० मोबाईल फोन,
४) ५ टॅब,
५) १०० पेक्षा जास्त फ्रॅन्चायजी ॲग्रीमेंट असून

-----------------------------------

एकूण किंमत २५,००,०००/-

नमुद गुन्हयामध्ये अदयापर्यत २० लोकांची फसवणुक झाल्याचे आढळून आलेले असून गुन्हे शाखेस अजुन तक्रारी प्राप्त होत आहे. वर नमुद कंपनीव्दारे ज्या नागरीकांची फसवणुक झाली आहे अशा नागरीकांनी कक्ष १०, गुप्रशा, गुअवि, मुंबई येथे संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

सदरची कारवाई हि **मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई श्री. देवेन भारती, मा. पोलीस सह आयुक्त (गुन्हे), श्री. अनिल कुंभारे, मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री. कृष्णकांत उपाध्याय, मा. पोलीस उप आयुक्त (प्रकटीकरण-१) श्री. नवनाथ ढवळे, व मा. सहा. पोलीस आयुक्त (डि-पश्चिम) श्री. धर्मपाल बनसोडे** यांचे मार्गदशनाखाली कक्ष १० गुन्हे शाखेचे प्रभारी पोलीस निरीक्षक विशाल राजे, पोलीस निरीक्षक संदीप शिंदे, म. सपोनि पुनम यादव, सहा. पोलीस निरीक्षक गणेश तोडकर, पोलीस उप निरीक्ष संदेश इंगळे, पोलीस उप निरीक्षक सुशांत बावचकर, सफौ जगदीश धारगळर, पोलीस हवालदार अमित जगताप, पांडुरग बाबर, अमर तडवी, पोलीस अंमलदार चंद्रशेखर डफळे, अनिकेत निकम, निलेश मांडवे, दिनेश परब, सुधाकर निर्मळे, अभिजीत अत्याळकर या पथकाने पार पाडली.

---

Scanned with OKEN Scanner